# ‘मेट्रो ३’ला जाहिरातींतून मिळणार कोट्यवधी रुपये

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने टाइम्स इनोव्हेटिव्ह मीडिया लिमिटेडला पंधरा वर्षांच्या कालावधीसाठी बाह्य जाहिरातींच्या अधिकाराचा परवाना दिला आहे. यामध्ये २७ स्थानके ३१ गाड्या, अन्सिलरी इमारतींमधील एकूण वीस हजार चौरस मीटर जागेसह स्थानकांच्या नाम अधिकारांचाही समावेश आहे. यामुळे मेट्रोला कोट्यवधींचा फायदा मिळू शकणार आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने यापूर्वी स्थानक नाम अधिकार, टेलिकॉम इन-बिल्डिंग सोल्यूशन्स, ऑप्टिकल फायबर केबलच्या निविदा काढल्या आहेत. सुमारे दीड लाख चौरस फुटांच्या व्यावसायिक जागांच्या परवान्यासाठीच्या निविदा खुल्या आहेत व त्यास उत्तम प्रतिसाद मिळत आहे. मुंबईच्या पहिल्या पूर्णतः भूमिगत मेट्रो मार्ग ३ चे पहिल्या टप्प्याचे कामा सध्या अंतिम टप्प्यात आहे. कफ परेड ते आरेपर्यंत २७ स्थानकांद्वारे हा मेट्रो मार्ग जोडला गेला आहे.